ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २० डिसेंबर, १९५० अंक ४८

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे
सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा
पाठिंबा मिळत असलेली.

[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागिदारांची
जबाबदारी मर्यादित असलेली. ]

स्थापना: १९१६.

मुख्य कचेरी :
सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहूपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची
उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी
मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे
विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.– ब्रँच सेक्रेटरी

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडवा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# विविध माहिती

**नवीन बोटींची मागणी**—विजगापट्टम येथील सिंधा बोटीच्या कारखान्याकडे भारत सरकारनें, ८००० टन वजनाच्या तीन मालवाहू बोटींची मागणी नोंदविली आहे. एक बोट बांधून सरकाराला देण्यांत आली असून दुसरी ह्या महिनाअखेर पुरी होईल. बोटींशिवाय रेल्वेच्या सामानाची व संरक्षण साहित्याचीही मागणी बोट कंपनीकडे नोंदविण्यांत येणार असल्याचें समजतें.

**संयुक्त प्रांताचा आर्थिक कार्यक्रम**—अ. भारतीय काँ. कमिटीच्या आर्थिक कमिटीकडे संयुक्त-प्रांत सरकारनें आपला पंचवार्षिक कार्यक्रम सादर केला आहे. कार्यक्रमांत दिलेल्या माहितीवरून असें दिसून येतें कीं, त्या राज्यांत धान्य साठविण्याची गुदामें पुरेशीं नसल्यामुळें दर वर्षी ५ लाख टन अन्नधान्य वाया जातें. ह्या धान्याची किंमत १३,५०,००,००० रुपये होईल. खेडेगांवांतील जनतेकडून सक्तीची मजुरी करून घेऊन रस्ते व पाटबंधारे बांधण्याचेही कार्यक्रमांत ठरविण्यांत आलें आहे.

**पगारी सुट्यांवर मर्यादा**—भारतीय सरकारनें आपल्या उपराज्यांच्या सरकारांना, कामगारांच्या पगारी सुट्या दरवर्षी १० पेक्षां अधिक असूं नयेत अशा सूचना देण्यास सांगावें, असें मत असोशिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेनें व्यक्त केलें आहे.

**कोकोच्या बियांचा पुरवठा**—कांहीं महिन्यांपूर्वी कोकोच्या बियांच्या किंमती ४० टक्क्यांनीं वाढल्या होत्या. आतां त्या पुन्हां उतरल्या आहेत. कोकोच्या बियांचा पुरवठा कमी पडणार नाहीं असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे. परंतु गोल्ड कोस्ट ह्या आफ्रिकन वसाहतींतील कोकोच्या पिकावर कीड पडल्याचीही वार्ता आहे. ज्या झाडांवर कीड पडली असेल तीं तोडून टाकणें येवढा एकच उपाय करतां येण्यासारखा आहे, व तो करण्यांत येत आहे. युद्धापूर्वी कोकोच्या पिकाची वार्षिक सरासरी ७,३०,००० टन होती. त्यापेक्षां थोडें अधिक पीक चालू सालीं येईल असा अंदाज आहे.

**शेत–जमिनीच्या मगदुराचे नकाशे**—संयुक्त प्रांत सरकार आपल्या राज्यांतील शेतकऱ्यांना पिकांसंबंधीं शास्त्रीय माहिती पुरविण्याची व्यवस्था करणार आहे. राज्यांतील निरनिराळ्या प्रकारांची जमीन व त्यांत येऊं शकणाऱ्या पिकांचे तपशीलवार नकाशे सरकारकडून तयार करण्यांत येत आहेत. जमिनीच्या रासायनिक पृथःकरणास अनुसरून शेतकऱ्यांना सल्ला देण्यांत येईल. कांहीं जिल्ह्यांतून प्राथमिक कामास प्रारंभही झाला आहे.

**खत तयार करण्याची स्पर्धा**—ग्रामीण भागांतील जनतेला खतासाठी खड्डे खणून खत तयार करण्यास उत्तेजन देण्यासाठी मध्य-भारत सरकारनें स्पर्धा लावण्याचें ठरविलें आहे. येत्या महिन्यांत ग्वाल्हेर येथें ग्रामोद्योगाचें एक प्रदर्शनही भरविण्यांत येणार आहे.

**पोलादाच्या कारखान्यासाठी फेर-अंदाज**—भारत सरकारनें एका अमेरिकन कंपनीच्या मदतीनें ओरिसांत एक व मध्य प्रदेशांत एक असे दोन पोलादाचे कारखाने काढण्याचें ठरविलें होतें. ह्या कारखान्यांसाठी लागणाऱ्या भांडवलाचा अंदाज अमेरिकन कंपनीनें दुरुस्त करून पाठविला आहे. प्रत्येक कारखान्यासाठी ७० कोटी रु. लागतील असा पहिला अंदाज होता. पण आतां प्रत्येकी ५० कोटी रु. अंदाज करण्यांत आला आहे.

**आयातीसाठी हुंडणावळ?**—जानेवारी ते जून, १९५१ ह्या काळांत आयात करण्यासाठीं ३०० कोटी रुपयांची परकीय हुंडणावळ भारतीय सरकारनें मंजूर केली आहे असें समजतें. व्यापारी व सरकारी अशी दोन्ही प्रकारच्या आयातीसाठीं मिळून ही हुंडणावळ राखून ठेवण्यांत आली आहे. १९५० च्या पहिल्या सहा महिन्यांत धान्य आयात करण्यासाठींही खास व्यवस्था करण्यांत आली आहे असें म्हणतात.

**सूर्यप्रकाशाशिवाय भाजीपाला व फळें**—रशियन शास्त्रज्ञांनीं सूर्यप्रकाशाशिवाय भाजीपाला पिकविण्यांत यश मिळविलें आहे. सूर्यप्रकाशाऐवजीं कृत्रिम प्रकाश वापरून सफरचंद, अक्रोड, द्राक्षें, इ. फळें त्यांनीं पिकविलीं आहेत. ह्या शोधामुळें फळें व भाजीपाला १२ महिनेही होऊं शकतील, इतकेंच नव्हे तर उत्तर ध्रुवासारख्या प्रदेशांतही तीं होऊं शकतील.

**शेतीच्या मालासाठी नियंत्रित बाजार**—मुंबई राज्यांतील शेतीच्या मालाला नियंत्रित बाजार मिळवून देण्यासाठी १९४७ सालीं एक योजना आखण्यांत आली होती. १९४७ मध्यें अशा तऱ्हेच्या २३ बाजारपेठा होत्या. आतां आणखी ८७ बाजार नियंत्रित बाजारांच्या मालिकेंत आणण्यांत येणार आहेत. गेल्या तीन वर्षांत अशा ३० अधिक बाजारपेठा संघटित करण्यांत आल्या. सध्या मुंबई राज्यांतील अशा बाजारांची संख्या ५३ आहे.

**स्त्रियांचीं कामें पुरुषांना करावीं लागणार**—येत्या दहा वर्षांत विणण्या–टिपण्यासारखीं बायकांचीं कामें पुरुषांना करावीं लागतील असा इषारा ब्रिटनच्या मजूर सरकारच्या एका अधिकाऱ्यानें दिला आहे. ब्रिटनमध्यें मजुरी करणाऱ्या बायकांचा आणि तरुण कामगारांचा तुटवडा पडत चालला आहे. उलटपक्षीं, उद्योगधंदे मात्र विस्तार पावत आहेत. अशा परिस्थितींत बायकांचीं समजलीं जाणारीं कामें पुरुषांना करावीं लागतील असा ह्या अधिकाऱ्याचा अंदाज आहे.

**नव्या दिल्लींतील सरकारी नोकर**—जुनी दिल्ली आणि नवी दिल्ली मिळून भारतीय सरकारचे ६४,००० नोकर राजधानींत रहात आहेत. त्यांपैकीं पहिल्या वर्गाचे वरिष्ठ अधिकारी १,८०० व दुसऱ्या वर्गाचे अधिकारी ६,००० पेक्षां जरा कमी आहेत. दुय्यम नोकर आणि कारकून सुमारें ३६,००० आहेत. कनिष्ठ दर्जाचे पट्टेवाले वगैरे २०,००० आहेत.

**आसाम–मदत फंडाची रक्कम**—आसामला मदत करण्यासाठी पंतप्रधान पं. नेहरू ह्यांनीं काढलेल्या फंडांत ता. ३-१२-५० पर्यंत १२,१५०,२९ रुपयांवर रक्कम जमा झाली, असें समजतें.

**ब्रिटिश उद्योगपतीची भारताला भेट**—ब्रिटनमधील एक प्रमुख उद्योगपति मि. ॲलन गुड हे लवकरच भारतांत येणार आहेत. मि. गुड हे ब्रिटनमधील ऑइल एंजिन्सच्या व विजेच्या उपकरणांच्या धंद्याचे प्रतिनिधी आहेत. ह्या उद्योगधंद्यांना भारताचें औद्योगिक आणि शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी काय करतां येईल ह्यासंबंधीं ते पाहणी करणार आहेत. मि. गुड पाकिस्तानलाही ह्याच उद्देशानें जाणार आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. २७ डिसेंबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## श्री. देशमुख ह्यांचा आढावा.

कलकत्ता येथील असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्सच्या वार्षिक बैठकींत भारताच्या अर्थमंत्र्यांनीं प्रतिवर्षीप्रमाणें नुकताच आर्थिक आढावा घेतला. हा आढावा घेतांना त्यांनीं भारताच्या अंतिम आर्थिक भवितव्याबद्दल विश्वास प्रकट केला, हें अर्थात् उचितच होतें. "लोकांनीं निर्भय अंतःकरणांनीं आणि शांत डोक्यांनीं परिस्थितीला तोंड दिलें आणि ते काळजीपूर्वक वागले, तर गुंतागुंतीच्या अडचणीहि अनुल्लंघनीय नाहींत," अशी आशा त्यांनीं व्यक्त केली. भारतांतील सर्वांगीण तीव्र अडचणीच्या परिस्थितींत परदेशी भांडवलास कितीतरी उपकारक कार्य येथें करतां येण्याजोगें आहे; त्यामुळें उभयपक्षांचाहि फायदाच होणार आहे असें सांगून त्यांनीं परदेशी भांडवलास आवाहन केलें. कोलंबो योजनेंत अशा परदेशी साहाय्याचा आराखडा तयार करण्यांत आलेलाच आहे. हें साहाय्य तातडीनें मिळणें भारताच्याच नव्हे, तर सहाय्यक राष्ट्रांच्याहि हिताच्या दृष्टीनें अगत्याचें आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें आपले आर्थिक प्रश्न अधिकाधिक बिकट होत असले, तरी त्यामुळेंच ते तातडीनें हाताळण्याची आणि जनता व सरकार ह्यांचेमधील घनिष्ट सहकार्याची व एकोप्याची आवश्यकता जास्तच निर्माण होते, असें त्यांनीं सांगितलें. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या महत्त्वाची व त्याचप्रमाणें संपत्तीच्या उत्पादनास योग्य अशी आर्थिक परिस्थिति निर्माण करण्याच्या महत्त्वाची सरकारास तीव्र जाणीव आहे; तुटीच्या परिस्थितीला विटलेल्या समाजांत एकाद्या गटाला त्याचें दुसऱ्या बाबतचें कर्तव्य कोणतें हें समजणें पुष्कळदां कठीण होऊन बसतें; परंतु निरनिराळ्या गटांना योग्य दिशेनें कृतिमान करणें त्यांच्यांतील सार्वजनिक पुढाऱ्यांचें काम आहे, असा त्यांनीं सल्ला दिला.

मंत्र्यांचें भाषण कसें असावें, ह्याचा श्री. देशमुख ह्यांचें भाषण हा आदर्श आहे, आणि त्याचें अनुकरण इतर जबाबदार मंत्र्यांनीं केलें तर त्यांचेवरील टीकेस कमी जागा राहील, असें म्हणतां येईल. श्री. देशमुख ह्यांनीं सरकारची बाजू पुढें मांडताना अडचणींचाहि उल्लेख केला आहे आणि सूचना करतांना त्यांत बोचकपणा येऊं दिलेला नाहीं. त्यांनीं भविष्यकाळाबद्दल आशावाद प्रकट केला, परंतु अनेक अडचणी दूर होण्यावरच तो आधारलेला आहे, हेंहि स्पष्ट केलें. भारताला वर ओढून काढण्यासाठींच नव्हे, तर इतर राष्ट्रांच्या स्वतःच्या बचावासाठींहि त्यांनीं भारताच्या प्रगतीस सढळपणें हातभार लावणें शहाणपणाचें ठरेल हें त्यांनीं एका लहान वाक्यांत मार्मिकपणें सांगितलें आहे. बिकट परिस्थितीचा अवास्तव फायदा कोणासहि घेतां येऊं नये अशी मनोवृत्ति निर्माण होण्याचें अगत्य त्यांनीं प्रतिपादलें आहे. थोडक्यांत म्हणजे, भारताच्या प्रगतीस केवळ भांडवल, यंत्रसामुग्री, कच्चा माल, प्रेरक शक्ती, वहातुकीचीं साधनें, धान्योत्पादन, इत्यादींचीच गरज नसून, मानसिक कणखरपणाची व सामाजिक दृष्टिकोणाचीहि तितकीच किंबहुना अधिक आवश्यकता आहे. अर्थातच, अर्थमंत्र्यांच्या आवाक्यांत हा प्रश्न नसल्यामुळें, सार्वजनिक पुढाऱ्यांना त्यांनीं जनतेस वळण लावण्याबद्दल सुचविलें आहे आणि सहकार्याची मागणी केली आहे. पुढाऱ्यांच्या व जनतेच्या सहकार्यावरच आर्थिक व इतर प्रगतीची गति अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे. त्याच्या अभावीं, कुशल अर्थमंत्रि तरी किती करूं शकणार? "हिंदी आर्थिक परिस्थिति समाधानकारक व आशादायक आहे, असें अर्थमंत्र्यांना वाटतें" अशा तऱ्हेच्या वर्तमानपत्री बातम्या वस्तुस्थितीचा विपर्यास करणाऱ्या असून, त्यामुळें जनतेला तिच्या कठोर कर्तव्यांतून सुटून जाण्यास प्रोत्साहन मिळण्याचा संभव आहे. अर्थमंत्र्यांच्या भाषणांतील एकादें वाक्य संदर्भ सोडून बाजूस काढणें त्यांच्या सबंध भाषणाच्या वास्तवतेस अन्यायकारक आहे.

## रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती

### सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट

रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती करणाऱ्या बिलावरील सिलेक्ट कमिटीनें त्यांत सुधारणा सुचविल्या आहेत. बहुतेक पिकांना बारा महिन्यांची कर्जाची मुदत पुरेशी असली, तरी उसासारख्या कांहीं पिकांचे बाबतींत पीक तयार होऊन तें विकलें जाण्यास ज्यास्त काळ लागतो. म्हणून बारा महिन्यांपेक्षा ज्यास्त काळासहि रिझर्व्ह बँकेनें कर्ज देणें बेकायदा असूं नये, अशी सिलेक्ट कमिटीची शिफारस आहे. प्रांतिक सहकारी बँकांकडून माहितीचे तक्ते मागविण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार असावा, अशा बँकांचा रिझर्व्ह बँकेशीं व्यवहार असो वा नसो, असेंहि सिलेक्ट कमिटीनें सुचविलें आहे. शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे पाठविण्याच्या तक्त्यांच्या वेळेची मुदत दोन दिवसांची पांच दिवस करण्यांत आली आहे. प्रो. के. टी. शहा ह्यांनीं आपलें स्वतंत्र मत सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टास जोडलें आहे. "शेतकऱ्यांना अधिक सोइस्करपणें कर्जपुरवठा करतां यावा, ह्यासाठीं इंपिरियल बँकेचें राष्ट्रीयीकरण होणें आवश्यक आहे" असें त्यांचें म्हणणें आहे.

### बृहन्महाराष्ट्राचें १०% डिव्हिडंड

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. नें ३० सप्टेंबर, १९५० अखेरच्या वर्षाकरितां ऑर्डिनरी भागांवर १०% डिव्हिडंड जाहीर केलें आहे. घसारा वजा केल्यावर ताळेबंदास नेलेला नफा १,१६,५९९ रु. आहे. त्यांत गतवर्षीचा शिलकी नफा १,११,११२ रु. मिळविल्यावर नफावाटणीस २,२७,७११ रु. येतात.

### सरदार पटेल !

सरदार पटेल ह्यांच्या शोचनीय निधनामुळें भारताचा श्रेष्ठ मुत्सद्दी व हिंमतवान महापुरुष त्यास मुकला आहे. त्यांच्यासारख्या खंबीर व चतुर नेत्याचें भारतास ह्यापुढें मार्गदर्शन मिळणार नाहीं; तथापि, आपल्यापुढील अनेकविध प्रश्नांस धैर्यानें व निश्चयानें तोंड देण्यास त्यांची स्मृति नेहमींच प्रोत्साहन देत राहील. त्यांच्या सारखे अनेक सुपुत्र भारताच्या उद्धारासाठीं पुढें येवोत !

## मँगेनीजच्या निर्यातीचें महत्त्व

सध्यां जगांत युद्धाचें वातावरण तापत चाललें आहे. अमेरिका आणि रशिआसारखीं बलाढ्य राष्ट्रें युद्धोपयोगी साहित्याचा सांठा करण्यासाठीं जोराचे प्रयत्न करीत आहेत. शस्त्रास्त्रनिर्मितीसाठीं जें पोलाद लागतें, तें तयार करण्यासाठीं 'मँगेनीज' ह्या धातूची फार गरज असते. १९४८ च्या मध्यापासून अमेरिकेला ह्या धातू पुरविण्याचें रशिआनें बंद केलें आहे. रशिआशिवाय द. आफ्रिका आणि भारत हे दोन देश मँगेनीज पुरवूं शकतात. खुद्द अमेरिकेंत ह्या धातूचें उत्पादन गरजेच्या मानानें फक्त १० टक्के होतें. गेल्या-वर्षी भारतानें ६,००,००० टन मँगेनीज निर्यात केलें. त्यापैकीं निम्मे अमेरिकेनें घेतलें. तथापि मँगेनीजच्या खाणींची परिस्थिति उत्पादनाच्या दृष्टीनें समाधानकारक नाहीं. ह्या दृष्टीनें बाँबे मेटालर्जिकल सोसायटीचे अध्यक्ष श्री. मितर ह्यांनीं दिलेली माहिती चिंतनीय वाटते.

सोसायटीपुढें बोलतांना श्री. मितर म्हणाले कीं भारतांतील मँगेनीजला अमेरिकेकडून अधिकाधिक मागणी येत आहे. परंतु खाणींतील उत्पादनाची पद्धत फार मागासलेली असल्यानें निर्यात वाढवितां येत नाहीं. ज्या खाणींतून ह्या धातूची कमी प्रतीची माती निघते, त्या खाणींतून योग्य त्या प्रकारची यंत्रसामुग्री मालकांनीं बसविलेली नाहीं. दुसरा महत्त्वाचा प्रश्न वहातुकीचा आहे. खाणीपासून रेल्वे स्टेशनपर्यंत माल नेण्यासाठीं चांगले रस्ते नाहींत.

ह्या धातूच्या अशुद्ध मातीपासून जितका शुद्ध धातू तयार होतो, त्याच्यापेक्षां तो बऱ्याच अधिक प्रमाणांत तयार करतां येणें शक्य आहे. तथापि ह्या बाबतींत जमशेटपूर येथील नॅशनल मेटालर्जिकल लॅबोरेटरी बरेंच साह्य देऊं शकेल. मँगेनीज काढण्यासाठीं लागणारे तज्ज्ञ एंजिनियर्स शिकवून तयार करण्याची सोय भारतांत नाहीं. एकूण परिस्थितीचा परिणाम असा झाला आहे कीं, भारताची मँगेनीजची निर्यात घटूं लागली आहे. १९५० सालच्या पहिल्या तिमाहींत भारतानें २,०५० टन मँगेनीज निर्यात केलें. परंतु दुसऱ्या तिमाहींत हा आंकडा कमी झाला आहे. भारताकडून सर्वांत जास्त निर्यात अमेरिकेला होते. त्या देशाच्या खालोखाल ब्रिटन आणि जपान हीं राष्ट्रें भारताचीं गिऱ्हाइकें आहेत. डॉलरसारख्या दुर्लभ चलनाची टंचाई भरून काढण्याच्या कामीं मँगेनीजच्या निर्यातीची होणारी मदत लक्षांत घेतां, त्या धातूच्या निर्यातीचें महत्त्व उघड दिसून येतें.

## भारतीय रेल्वेसाठीं इंजिनें व डबे

भारतानें ४·८३ कोटी रु. किंमतींचीं आगगाड्यांचीं २१७ इंजिनें आणि ८·१४ कोटींच्या वाघिणी, पेट्रोलच्या टांक्या व प्रवासी डबे यांकरितां ब्रिटिश आणि युरोपांतील कंपन्याकडे मागणी केली आहे. यामध्यें ३० ब्रॉड गेज रेल्वे इंजिनें, १५० वाय. पी. मीटर गेज इंजिनें, विविध प्रकारच्या ७,१६० वाघिणी, ४१० पेट्रोलच्या टांक्या आणि २५० तिसऱ्या वर्गाचे संपूर्ण पोलादी डबे, यांचा समावेश आहे.

## श्री. लोकूर ह्यांची नेमणूक

न्या. लोकूर, मुंबई हायकोर्टाचे एक माजी न्यायाधीश व रेल्वे रेट्स ट्रायब्यूनलचे चेअरमन, ह्यांची इंडियन लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचे सभासद म्हणून नेमणूक झाली आहे.

## छापण्याच्या शाईच्या संशोधनार्थ प्रदर्शन

छापण्याच्या शाईच्या संशोधनाची माहिती शाईशीं हितसंबंध असणाऱ्यांच्या नजरेस यावी ह्या हेतूनें इंडियन प्रिंटिंग इंक्स रिसर्च असोसिएशनतर्फे एक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. त्याचें स्थळ फर्ग्युसन कॉलेजांतील रसायन शाळा हें असून त्याचें उद्घाटन प्रो. मॅक्बेन, एफ्. आर. एस., नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ऑफ इंडियाचे डायरेक्टर, ह्यांच्या हस्ते दि.२३ रोजीं होणार आहे. छापण्याच्या शाईस लागणारा कच्चा माल, शाईचे गुण तपासण्याची सामुग्री, कागद आणि त्याचा शाईशीं संबंध, शाईतील रंगांची शास्त्रीय माहिती, संशोधनास वाव, इत्यादि गोष्टी प्रदर्शनांत दाखविल्या व समजावून सांगितल्या जातील. हिंदी बनावटीच्या शाईचा दर्जा अत्युच्च करण्यास कारखानदारांना मदत करणें हा असोसिएशनचा अंतिम हेतु आहे. असोसिएशनचे ऑनररी सेक्रेटरी डॉ. प्रो. ढोले, एम्. एससी., पीएच. डी ह्यांच्या नेतृत्वाखालीं असोसिएशनचे हातून भरीव कामगिरी होण्यास आवश्यक तें द्रव्य व इतर साहाय्य तिला मिळणें आवश्यक आहे. प्रस्तुत प्रदर्शनामुळें शास्त्रीय संशोधन व उद्योगधंदे ह्यांच्या सहकार्याचें महत्त्व स्पष्टपणें दिसून येईल, हीहि कमी महत्त्वाची गोष्ट नाहीं.

## कंपनी कायदा तज्ज्ञ समितीची बैठक

भारत सरकारनें नेमलेल्या कंपनी कायदा तज्ज्ञ समितीची पहिली बैठक दि. १५ रोजीं श्री. सी. एच. भाभा यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबई येथें भरली होती. भारतीय कंपनी कायद्याची दुरुस्ती करण्याचा सरकारचा विचार १९४८ पासून चालू आहे. डिसेंबर १९४९ मध्यें बऱ्याच संबंधित गटांना या कायद्याच्या दुरुस्तीसंबंधीं एक निवेदन पाठविण्यात आलें होतें. त्यावर हितसंबंधीयांच्या बऱ्याच सूचना आल्या असून कंपनी कायदा तज्ज्ञ समितीचें काम या सूचनांची तपासणी करून १९३६ त दुरुस्त केलेल्या १९१३ भारतीय कंपनी कायद्यांत कोणते बदल करणें आवश्यक आहे त्याची शिफारस करणें हें आहे. अध्यक्षाखेरीज समितींत १२ सदस्य असून श्री. डी. एल. मुजुमदार, आय. सी. एस. हे तिचे सभासद–कार्यवाह आहेत.

## सहकारी संस्थासंबंधींच्या नियमांत दुरुस्ती

१९२७ च्या बॉम्बे कोऑपरेटिव्ह सोसायटीज रूल्समध्यें करण्यांत यावयाच्या दुरुस्तीविषयीं हरकती व सूचना पाठवावयाच्या असतील तर त्या ता. १० जानेवारी १९५१ पूर्वी सरकारकडे पाठवाव्या. या दुरुस्तीनुसार सहकारी संस्थांना कांहीं विशिष्ट अटी घालण्यांत येणार असून दुरुस्तीचा आराखडा मुंबई सरकारच्या ता. ७ डिसेंबरच्या गॅझेटच्या भाग ४ ब मध्यें प्रसिद्ध झाला आहे. हरकती व सूचना मुंबई सरकारचे विकास खात्याचे सेक्रेटरी किंवा जिल्ह्याचे कलेक्टर अगर रजिस्ट्रार ऑफ कोऑपरेटिव्ह सोसायटीज पुणें, यांचेकडे पाठवाव्यात.

**तेलाच्या धंद्यांतील संशोधन**—पेट्रोल आणि त्यापासून बनविण्यांत येणारे पदार्थ हा अमेरिकेचा एक मोठा धंदा आहे. ह्या धंद्याला उपयुक्त असें संशोधन करण्यासाठीं अमेरिकेंत १५,००० स्त्रिया व पुरुष खपत असतात. ह्याच कामासाठीं १९२० सालीं फक्त २०० लोक नोकरीवर होते.

## ब्रिटिश साम्राज्याच्या आर्थिक विकासाची योजना

ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहतींचा आर्थिक उत्कर्ष घडवून आणण्यासाठी, ब्रिटिश पार्लमेंटनें १९४८ सालीं ओव्हरसीज रिसोअर्सेस डेव्हलपमेंट ॲक्ट मंजूर केला. ह्या कायद्याचा हेतु असा आहे कीं, साम्राज्यांतील देशांचें उत्पादन व व्यापार ह्यांचा विकास साधण्यासाठी, खाजगी भांडवलाबरोबरच ब्रिटनमधील सार्वजनिक स्वरूपाच्या द्रव्यबळाचाही उपयोग करून घेण्यांत यावा. कायद्याप्रमाणें कलोनिअल डेव्हलपमेंट बोर्डाला १० कोटी पौंडांपर्यंत कर्जें काढण्याचा अधिकार देण्यांत आला. त्याशिवाय १ कोटी पौंडांपर्यंत अल्प मुदतीचीं कर्जें काढण्याचा अधिकारही देण्यांत आला आहे. कॉर्पोरेशनच्या पैशाचा उपयोग कोणत्या कामासाठी आणि कशा पद्धतीनें करण्यांत यावा ह्यासंबंधीं कॉर्पोरेशनला पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे. वसाहतींतील जनतेच्या हिताच्या दृष्टीनें पैशाचा वापर केला जातो कीं नाहीं हें पहाण्याचें काम मात्र सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर कालनीज् ह्यांच्याकडे आहे. कॉर्पोरेशननें हातीं घेतलेली एखादी विकासाची योजना व्यापारी दृष्टीनें योग्य आहे किंवा नाहीं हें कॉर्पोरेशननेंच ठरवावयाचें असतें. कॉर्पोरेशनच्या कार्यासंबंधीं सर्वसामान्य सूचना कायद्यांत देऊन ठेवण्यांत आलेल्या आहेत. त्यांत एक अशी आहे कीं, ज्या देशांत एखादी योजना अमलांत आणण्याचें कॉर्पोरेशन ठरवील त्या देशाच्या सरकारच्या सल्लामसलतीशिवाय कॉर्पोरेशननें पुढें पाऊल टाकूं नये.

आतां प्रत्यक्ष व्यवहारांत कॉर्पोरेशन कोणत्या पद्धतीनें काम करतें तें पाहूं. खाजगी भांडवलाच्या अगर सार्वजनिक भांडवलाच्या चालू उद्योगधंद्यांना कॉर्पोरेशननें कर्जें दिलेलीं आहेत. ब्रिटिश ग्वायना गोल्ड फील्डस् ह्या खाजगी भांडवलाच्या कंपनीला कॉर्पोरेशननें कर्ज दिलेलें आहे. त्याचप्रमाणें मलायन इलेक्ट्रिसिटी बोर्ड ह्या सार्वजनिक स्वरूपाच्या संस्थेलाही ३७,५०,००० पौंड कर्ज दिलेलें आहे. मालाचें उत्पादन व विक्री, किंवा एखाद्या चालू कंपनीशी भागीदारी करणें, तिचें कांहीं भांडवल खरेदी करणें, इत्यादि विविध प्रकारांनीं कॉर्पोरेशन आपलें कार्य करीत आहे. गेल्या अडीच वर्षांत कॉर्पोरेशननें ३७ निरनिराळ्या प्रकारच्या योजना हातीं घेतल्या आहेत. त्याशिवाय आणखी ४९ योजनांसंबंधीं तपासणीचें काम चालू आहे. एकूण २ कोटी पौंडांची जबाबदारी कॉर्पोरेशननें आपल्या अंगावर घेतली आहे. तथापि ह्यांपैकीं बरीच रक्कम अद्यापि गुंतवावयाची राहिली आहे. कॉर्पोरेशननें हातीं घेतलेल्या बऱ्याच योजना दीर्घकालीन आहेत. त्या पूर्ण होऊन नफा होऊं लागण्यास अर्थातच अवधी लागेल. बहुतेक योजना शेतीच्या आणि जंगलें वाढविण्याच्या आहेत. ह्या योजनांच्या अनुषंगानें करावीं लागणारीं इतर कामेंही कॉर्पोरेशन करीत आहे. उदाहरणार्थ, नवीन जमीन लागवडीखालीं आणणें, रस्ते व इमारती बांधणें, पाट बंधारे बांधणें आणि सांडपाण्याची कामें करणें, इत्यादि. अशा प्रकारच्या दीर्घकालीन योजनांत खर्च फार होतो आणि त्यांत आर्थिक धोकाही असतो; म्हणून खाजगी भांडवल ह्या कामीं साह्य करण्यास फारसें पुढें येत नाहीं. अशा कामासाठी भांडवल पुरविणें हा डेव्हलपमेंट ॲक्टचा एक प्रमुख हेतू होता. ह्या हेतूस अनुसरून कॉर्पोरेशनच्या एकूण भांडवलापैकीं ३७ टक्के भांडवल अशा प्रकारच्या योजनांत गुंतविण्याचें ठरलें आहे.

दीर्घकालीन योजनांपैकीं कांहीं उदाहरणादाखल घेऊं. गँबिआ (आफ्रिका) मध्यें कॉर्पोरेशननें योजना हातीं घेतल्या आहेत. कोंबड्या पाळण्याची एक मोठी कंपनी तेथें सुरू करण्यांत आली आहे. ह्या योजनेपासून आतां उत्पन्न मिळूं लागलें आहे. १९५१ च्या जून अखेर कंपनी १ कोटी अंडीं आणि ५,००,००० पौंड वजनाच्या कोंबड्या पुरवील असा अंदाज आहे. दुसरी योजना तांदुळाच्या उत्पादनाची आहे. गँबिआ नदीच्या कांठीं पाटबंधाऱ्यांच्या साह्यानें तांदूळ पिकविण्यांत येणार आहे. तांदुळाची शेती यांत्रिक पद्धतीनें करण्यांत येणार आहे. सध्या ही योजना प्राथमिक अवस्थेंत आहे. परंतु ती पूर्ण झाल्यावर गँबिआ ही वसाहत जरूरीच्या अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण होईल. ह्या दोन योजनामुळें गँबिआच्या अर्थव्यवस्थेंत क्रांतिकारक बदल घडून येणार आहे. गेल्या ५० वर्षांत ह्या वसाहतीचा आर्थिक विकास फारच थोडा झालेला आहे. भुईमुगाच्या निर्यातीवर ह्या वसाहतीची अर्थव्यवस्था अवलंबून असे. ह्या पिकाच्या बाजारभावांतील चढउताराप्रमाणें वसाहतींत आर्थिक परिस्थिति हेलकावे खात असे. पूर्वी भुईमुगाच्या हंगामांतच फक्त रोजगार मिळूं शकत असे. आतां निरनिराळीं पिकें निघण्याची शक्यता उत्पन्न झाल्यानें रोजगारीही सर्व वर्षभर मिळूं लागेल.

ज्या वसाहतीचा विकास करावयाचा तेथील लोकांचें सहकार्य मिळविण्याचें कॉर्पोरेशनचें धोरण आहे. प. आफ्रिकेंतील नायगेरिआ कॉलनींतील जंगलाचा उपयोग करण्यासाठीं कॉर्पोरेशननें ओमो सॉमिल्स ह्या नांवाची एक कंपनी काढली आहे. ही कंपनी कॉर्पोरेशनची दुय्यम म्हणून काम करणार आहे. नायगेरिअन सरकारशीं भागीदारी पत्करून शेतकऱ्यांची वसाहत करण्याचा एक कार्यक्रमही कॉर्पोरेशननें हातीं घेतला आहे. ह्या वसाहतींतील प्रत्येक कुटुंबाला २६ एकर जमीन देण्यांत येणार असून, सर्व वसाहतीसाठीं जो पिकांचा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. त्याप्रमाणें प्रत्येक वसाहतवाल्यानें जमिनीची लागवड करावयाची आहे. मासे पकडणाऱ्या धंद्यांतही कॉर्पोरेशननें लक्ष घातलें आहे. हिंदी समुद्रांत सेकिलज बेटावर हा धंदा संघटित करण्यांत येत आहे. पूर्व आफ्रिकेंत मजुरी करणाऱ्या कामगारांचें अन्न निकस असतें; त्यांत प्रथिनें कमी असतात हें प्रसिद्धच आहे. त्यामुळें आफ्रिकेच्या औद्योगिक विकासाच्या योजना नीट पार पडतां येत नाहींत. पूर्व आफ्रिकेंतील मजुरांना सुके मासे पुरविण्यांत आले तर सकस अन्नाचा आणि अप्रत्यक्षपणें औद्योगिक विकासाचा मार्ग सुलभ होईल. ब्रिटिश ग्वायना आणि ब्रिटिश होंडुरास ह्यासंबंधी कमिशननें केलेल्या सूचनांचाही कॉर्पोरेशननें विचार केला आहे. ह्या दोन्ही वसाहतींतील वाढत्या लोकसंख्येचा योगक्षेम नीट चालावयाचा असेल तर तेथील शेतीचा मोठ्या प्रमाणावर विकास होणें आवश्यक आहे. ब्रिटिश हाऊसमध्यें अशा तीन योजना कार्पोरेशननें अंमलांत आणण्यास सुरवात केली आहे. ब्रिटिश ग्वायनांत लांकूड कापण्याचा आणि निर्यात करण्याचा धंदा कॉर्पोरेशनें करण्यास प्रारंभ केला आहे. ह्या वसाहतीची आणखी भरभराट करण्याच्या कार्यक्रमांतील हे पहिलें पाऊल आहे. सिंगापूरमध्यें घराची टंचाई आहे. कामगार वर्ग, कारकून वर्ग, आणि कमी उत्पन्न असणारे इतर लोक ह्यांना घराची टंचाई फारच जाणवते. त्यांची सोय करण्यासाठीं कॉर्पोरेशननें एक बिल्डिंग सोसायटी काढली आहे. कॉर्पोरेशनच्या कार्याबद्दल ब्रिटनमध्यें टीका होते; परंतु एकंदरीनें वसाहतींचा आर्थिक विकास करण्याचें बरें काम होत आहे असा कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांचा विश्वास आहे.

## ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहतींचा विकास: कॉर्पोरेशनच्या चालू आणि नियोजित कार्यांची रूपरेषा

| | | शेती | प्राणिज पदार्थ | इंजिनिअरिंग | कारखाने | आर्थिक मदत | मच्छीमारी | जंगलें | हॉटेल्स | धातू | वहातूक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आफ्रिका: पूर्व | केनिया | | | | ■ □ | | | | | □ | |
| | टांगानिका | | □ | | | | □ | ■ | □ | ■ □ | □ |
| | युगांडा | | | | □□□ | | | | □□ | | |
| | सोमालीलँड | | □ | | | | | | | | |
| आफ्रिका: मध्य | उ. ऱ्होडेशिया | | | | ■ □ | | | | □ | | |
| | न्यासालँड | ■■ | □ | | | | ■ | □ | ■ | | |
| आफ्रिका: हायकमिशन प्रदेश | नायगेरिया | ■ | | | □□□ | ■ | ■ | ■ | | | □ |
| | गँबिया | ■■ | ■ | | | | | | | | |
| | बेच्युअॅनालँड | | □□ | | | | | | | | |
| | स्वॅझीलँड | ■ | □□ | | | | | ■ | | | |
| वेस्ट इंडीज | बहामाज | □ | | | | | | | □ | | |
| | ब्रि. गिनी | □ | | | | | | ■ | | □ | |
| | ब्रि. हाँडुरास | ■■■ | □ | | | | □ | | ■ | | |
| | जमेका | | | | □□□□□ | | | | | | |
| | विंडवर्ड बेटें | ■ | | ■ | | | | | | | |
| | त्रिनिदाद | | | | □□ | □ | | | | | |
| अति पूर्व | मलाया | ■ □ | | | □□ | ■ | □ | | | | |
| | सिंगापूर | | | | | ■ | | | | | |
| | उ. बोर्नियो | ■ □□ | | □□ | | | | | | | |
| प. पॅसिफिक | फिजी | | | □ | | | | | | | |
| भूमध्य सामुद्रिक | सायप्रस | | □ | | | | | | | | |
| | जिब्राल्टर | | | | | | ■ | | | | |
| इतर | डिसेप्शन बेटें | | | | | | □ | | | | |
| | फाकलंड बेटें | | □ | | | | ■ | | | | |
| | सेचिल्स | | | | | | ■ | | | | |
| | त्रिस्तान-द्-कुन्हा | | | | | | □ | | | | |

चालूं असलेलें काम : भरीव खुणा.

नियोजित काम : पोकळ खुणा.


# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१८,२६५
खेळतें भांडवल रु. ७१,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

## पति, पत्नी आणि पैसा

एका श्रीमान् विधवेनें एका गरीबाशीं विवाह केला. प्रत्येक वेळा ती आपल्या पतीला पटवून देई, कीं तिच्या पैशानेंच संसार चाललेला आहे. एकदां पतीनें नवा रेडिओ खरेदी केला. तो घरीं आल्यावर, पत्नी म्हणाली, "माझे पैसे नसते तर हा रेडिओहि इथें नसता." पतीनें शांतपणें उत्तर दिलें, "मला वाटतं, तुला आतां सांगायला हरकत नाहीं, कीं तुझे पैसे नसते तर मीहि इथं नसतों."

## "तिकिट दाखवा"

"तिकिटें दाखवा" तिकिट कलेक्टर म्हणाला आणि एक गरीब म्हातारा सोडून बाकीच्या सगळ्यांनीं आपलीं तिकिटें भराभर दाखविलीं. "महाराज, आपल्यामुळें गाडीला खोळंबा होत आहे. अरे पण, तें तुमच्या तोंडांतच आहे की." तिकिट कलेक्टर उद्गारला आणि गाडी सुरू झाली. शेजारच्या उतारूनें म्हाताऱ्याला विचारलें, "आपल्याला विस्मरण होतं वाटतं?" "छे, छे, गेल्या आठवड्यांच्या तिकिटांवरील तारीख मी चोखून टाकीत होतों." असें म्हाताऱ्यानें उत्तर दिलें.

## कुत्र्यांचा आयुर्विमा

कुत्र्यांसाठी पेटंट अन्न : एक अमेरिकन कंपनी कुत्र्यांच्या आयुष्याचे विमे स्वीकारूं लागली आहे. या अन्नाचे डबे वक्तशीर विकत घेऊन, त्या डब्यांत असणारीं विम्याचीं तिकिटें कंपनीकडे कुत्रा–मालकांनीं धाडावयाचीं असतात. कुत्र्याची वैद्यकीय परीक्षा घेतली जात नाहीं, परंतु कुत्र्याचें वय १२ वर्षांखालीं असलें पाहिजे आणि तें ८ वर्षांपेक्षां अधिक असेल तर त्याचा फक्त अपघाताविरुद्धच विमा स्वीकारला जातो. विषानें किंवा माणसानें मारल्यामुळें मृत्यू आल्यास मात्र त्याची जोखीम कंपनीवर नाहीं.

## मद्रास कॉर्पोरेशनचें कर्ज

मद्रास कॉर्पोरेशननें विमा कंपन्या आणि बँका यांच्याकडून ३० लाख रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. या कर्जाचा विनियोग घरें बांधणें, गलिच्छ वस्त्या सुधारणें, पादचाऱ्यांचे रस्ते बांधणें, इत्यादि कामासाठीं करण्यांत येणार आहे. हें कर्ज दरवर्षी १० लाख रु. अशा हप्त्यानें उभारण्यांत यावें आणि त्याचा उपयोग ज्या कामाकरितां तें काढलें असेल त्यासाठींच करण्यांत यावा, अशी अट मद्रास सरकारनें घातली आहे.

## ब्रिटिश दृष्टिकोनांतून कोलंबो-योजना

"येत्या सहा वर्षांत ग्रेट ब्रिटननें ३० कोटी पौंड उपलब्ध करून द्यावयाचे आहेत. त्यापैकीं २४½ कोटी पौंड स्टर्लिंग गंगाजळींतून दिले, तरी त्यांच्या किंमतीइतका माल इंग्रज कामगारांनीं तयार करूनच ही रक्कम देतां येणार आहे. ५½ कोटी रुपये इंग्रज नागरिकांना कर–उभारणींतून द्यावे लागतील; ही गोष्टहि सोपी नाहीं." स्पेक्टेटर, १ डिसेंबर.

"दक्षिण व आग्नेय आशियांतील देशांतील सरकारें भक्कम पायावर आधारित असणें जरूरीचें आहे. बाहेरील हल्ल्यांचा त्यांना प्रतिकार करतां आला पाहिजे. त्याचप्रमाणें, आर्थिक प्रगति घडवून आणण्याचे कामीं ते तत्पर पाहिजेत. पहिली गोष्ट ही सर्वस्वी त्यांच्यावरच अवलंबून आहे; दुसऱ्या दोन गोष्टींसाठी त्यांना बाहेरील मदत लागेल. बर्मा आणि इंडोनेशिया यांना कोलंबो योजनेंत सामील होण्याची उत्सुकता दिसत नाहीं. परंतु कालांतरानें तेहि इतर देशांचें अनुकरण करतील अशी अपेक्षा आहे."

एकॉनॉमिस्ट, २ डिसेंबर.


पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४११ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनकोसोप.   टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५.  } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.






अल्प खर्चांत त्वरित व सहज काम करवून घ्या

शेतकरी, खाणींतील मजूर, रेल्वे कामगार, रस्ते तयार करणारे—हे सर्व टाटाचीं ॲग्रिको फावडीच पसंत करतात. खास उंची कार्बन पोलादी पत्र्यापासून बनविलेली हीं फावडीं दीर्घकाल टिकतात-म्हणूनच तीं वापरणें शेवटीं फायदेशीर ठरतें! त्यांच्या सुयोग्य आकारामुळें तीं वापरण्यास अधिक सोईस्कर असतात—व अशा रीतीनें तीं वेळेची व श्रमाची बचत करतात!

अंतिम काटकसरीसाठीं ॲग्रिको हत्यारें खरेदी करा!

टाटा ॲग्रिको अवजारें

शाखा : मुंबई, मद्रास, कानपूर, जबलपूर, नागपूर, विजयनगरम व सिकंदराबाद.

नजिकच्या लोखंडी-सामानाच्या दुकानांत चौकशी करा अगर परस्पर आम्हांला लिहा.

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| मागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

### १५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. १४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरी–लक्ष्मी रोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

–: शाखा :–

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर व पौड

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७
हेड ऑफिसः––हायस्कूल रोड, सांगली.
शाखाः—१ जत, २ मिरज.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें ,, | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चे वर. |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

सरकारतर्फे:—
मे. भ. अं. दप्तरदार, B. A., चेअरमन.
मे. असि. रजिस्ट्रार कॉ. सो. सातारा.
मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.
मे. ज. वि. करमरकर, सराफ.

सोसायट्यांतर्फे:—
मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.
मे. हिं. म. पाटील.
मे. रा. म. पाटील.

वैयक्तिक सभासदांतर्फे:—
मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
मे. सु. आ. पाटील.

करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर. म. अं. दप्तरदार, बी. ए. चेअरमन.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः–पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर (जि. नाशिक )
पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) ||| श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

### एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

## जपानमधील औद्योगिक परिस्थिति

जपानचे भारतांतील व्यापारी-प्रतिनिधी मि. किरियामा ह्यांनीं जपानमधील औद्योगिक परिस्थितीसंबंधीं एका मुलाखतींत बरीच उपयुक्त माहिती सांगितली. ते म्हणाले कीं, जपानमध्यें कांहीं ना कांहीं प्रसंगानें समारंभ नेहमींच चालू असतात. ह्या समारंभांतून खाणें-पिणें (दारू) आणि धूम्रपान ह्यांना अर्थातच ऊत येतो. सरकारहि अशा समारंभांना उत्तेजन देतें. कारण, त्याच्यामुळें सरकारला कराचें उत्पन्न अधिक होतें.

गेलें महायुद्ध संपल्यावर एकाच वर्षांत जपानी जनतेनें आपला तोल सांभाळला. आज जपानचें औद्योगिक उत्पादन वाढलें असून तें चीनशीं युद्ध सुरू होण्याच्या सुमारास जितकें होतें तितकें पुन्हां होऊं लागलें आहे. १९४२ सालीं जपाननें उत्पादनाचा उच्चांक गाठला होता. परंतु ह्यापैकीं बहुतेक उत्पादन युद्धोपयोगी होतें. जपान फक्त कापड आणि कांचेचें सामानच निर्यात करूं शकेल असा समज आहे, पण तो चुकीचा आहे. जपान आजही बरीच शेतीचीं यंत्रें आणि अवजड यंत्रसामुग्रीही सवलतीच्या अटींवर निर्यात करूं शकेल. त्याशिवाय जपानजवळ जुनी पण वापरतां येण्यासारखी पुष्कळ यंत्रसामुग्री आहे. ती फार स्वस्ताईनें निर्यात करतां येईल. जपानच्या औद्योगिक पुनर्घटनेस अमेरिकेनें बरीच मदत केली आहे ही गोष्ट खरी आहे. अमेरिकेनें कोट्यावधि डॉलर्स किंमतीचा माल जपानमध्यें आणला आहे. जपान व्यापण्यांत आपला फार खर्च होत आहे आणि तो टाळतां येण्यासाठी जपानला पुन्हा त्याच्या पायावर उभें करणें जरूर आहे हें अमेरिकेला पटलें आहे. कोरियाच्या युद्धामुळें जपानला अनपेक्षित लाभ झाला. जपानच्या आयात-निर्यातींत ४० कोट डॉलर्सचा फरक होता. तो तर जपाननें कोरियन युद्धाचा फायदा घेऊन भरून काढलाच, पण आयातीपेक्षां निर्यातही अधिक करण्यांत येऊं लागली.

जपानला भारताचा कापूस, खनिजें, तेलबिया आणि ताग ह्यांची गरज आहे. जपान भारताला यंत्रसामुग्री देऊं शकेल. बोटीसुद्धां जपान भारताला पुरवूं शकेल. आज जपानच्या बोटी बांधण्याच्या गोदींत तयार होणाऱ्या बोटींची संख्या जगांत तिसऱ्या अनुक्रमाची लागेल. जपानमध्यें चलनाचा सुकाळ झालेला आहे. युद्धापूर्वी ज्या कपड्यांना ५० येन पडत असत त्याची किंमत आज २०,००० येन आहे. उलट पक्षीं, शाळामास्तरसारख्या सामान्य माणसाला युद्धापूर्वी ८० ते १०० येन पगार मिळत असे त्यालाच आज ८,००० ते १०,००० येन पगार मिळतो. एकंदरीनें पहातां किंमती २०० पट वाढल्या आहेत. पगार आणि रोजगार मात्र १०० पटीनेंच वाढले आहेत. अर्थातच रहाणीचें मान खालावलें आहे. तरीसुद्धां जपानमध्यें आज कोणी भुकेनें मेला असें होत नाहीं, किंवा घराच्या अभावीं कोणाला पादचाऱ्यांच्या रस्त्यावरही जीवन कंठावें लागत नाहीं. गहूं आणि तांदूळ ह्यांच्या बाजारांत थोडासा काळा बाजार आढळतो, पण तेवढाच. जपानमध्यें नियंत्रणें नाहींत, त्यामुळें काळा बाजारही नाहीं. जपानच्या भवितव्याबद्दल जपानी जनतेला मोठी आशा वाटते. लवकरच जपान आपला पक्का माल जगाच्या बाजारपेठेंत पाठवून इतर देशांशीं स्पर्धा करूं लागेल.

**पाकिस्तानांत अभ्रकाच्या खाणी**—पाकिस्तानच्या वायव्य भागांत चित्रळ भागांत तीन ठिकाणीं अभ्रकाच्या खाणी सांपडल्या आहेत असें समजतें. पाकिस्तानचें सरकार चित्रळ भागांतील भूगर्भाचें भूस्तरशास्त्रदृष्ट्या संशोधन करीत आहे, अशीही बातमी आहे.

## मुंबई-पुण्याचा वीजपुरवठा

टाटा पॉवर कं. लि. नें ३० जून, १९५० अखेर संपलेल्या वर्षी ५०,८९,४७,१६९ युनिटस वीज विकली. त्याचें तिला १,१७,४३,८८० रु. उत्पन्न झालें. १९४८-४९ चे मानानें ०.२% वीज कमी खपली, त्याचें कारण तळ्यांतील पाणी अपुरें पडूं नये म्हणून रेल्वेज़ना वीज कमी पुरविण्यांत आली. हा पुरवठा ५२% कमी झाला तरी इतर मागणी पुष्कळच वाढली आणि तिला दिलेल्या विजेचा दर जास्त होता. हैड्रोइलेक्ट्रिक-कंपन्यांनीं मुंबईच्या गिरण्यांना वीज पुरविली. त्यावरील प्रत्येक यूनिटवर ०.१२५ आणे सरकारी कर वसूल करण्यांत आला, त्याची रक्कम ४१,७५,८२२ रु. भरली. गिरण्यांचें विजेचें बिल ३२% नें वाढलें. रेल्वेच्या चोला पॉवर स्टेशनची उत्पादनक्षमता वाढविण्यांत येत आहे. टाटाहि लवकरच आणखी ३०,००० कि. वॅ. वीज पुरविण्यास प्रारंभ करतील आणि मुंबई सरकारनेंही ५४,००० कि. वॅ. शक्तीचें स्टीम जनरेटिंग प्लँट मागविलें आहे. ही सर्व वीज उपलब्ध झाली, तरी त्यामुळें १९५४ मधील मागणी पुरी पडूं शकेल. म्हणजे, आणखी कितीतरी उत्पादन होणें अगत्याचें आहे.

टाटा हैड्रोइलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कं. लि. नें ३० जून, १९५० अखेर संपलेल्या वर्षी १९,५५,७८,८६८ यूनिटस वीज विकली. तिचें उत्पन्न ४१,९३,५५१ रु. झालें. ह्या कंपनीनेंहि रेल्वेज़ना वीजपुरवठा कमी केला आणि तो इतर गिऱ्हाइकांकडे वळविला, त्यामुळें कमी वीज विकूनहि त्यापासून मिळकत जास्त झाली.

## भातांतील सत्त्वें कृत्रिमपणें वाढविण्याचा प्रयोग

वास्तविक पहातां, भातामध्यें जीवनसत्त्वें गव्हांतील सत्त्वांच्या तोडीचीं आहेत, परंतु भाताचा कोंडा काढून व तो शिजवून त्यास सत्त्वहीन करण्याचा प्रघात सर्वत्रच प्रचलित आहे. भाताचा दर्जा सुधारल्याविना, भात खाणाऱ्या देशांतील लोकांना आवश्यक तीं सत्त्वें मिळूं शकणार नाहींत आणि त्यामुळें कांहीं रोगांचें निर्मूलन करणें कठीण जाईल. भातामधील जीवनसत्त्वांत कृत्रिमपणें भर घालण्याची युक्ति डॉ. रॉबर्ट आर. विल्यम्स ( विल्यम्स-वॉटरमन फंड फॉर दि कॉंबट ऑफ डायटरी डिसिझेजचे अध्यक्ष ) ह्यांनीं प्रतिपादली आहे. भातापैकीं कांहीं दाण्यांवर जीवनसत्त्वांचा फवारा उडवावयाचा व हे दाणे बाकीच्या दाण्यांत मिसळावयाचे, अशी ही योजना आहे. फिलिपाइन्समध्यें तिचे सुपरिणाम सिद्ध झाले आहेत, असें सांगण्यांत येतें.

## कलकत्ता सर्कलच्या चलनी नोटा

रिझर्व्ह बँकेनें कलकत्ता सर्कलच्या चलनी नोटा प्रसृत करण्याचें बंद केलें आहे. बर्मासाठी काढलेल्या 'इनस्काइब्ड' नोटा कलकत्ता सर्कलच्याच होत्या आणि त्या थोडा फरक करून हिंदी नोटासारख्या दिसण्याजोग्या बनवितां येणें शक्य होतें.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( स्थापना १९१८ )
हेड ऑफिस—
गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, मार्केट—बेळगांव

## संसदेंत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

अवमूल्यन, इतर देशांतील वाढती खरेदी, आणि आयात नियंत्रण यामुळें व्यापार व देणें-घेणें सुधारलें आहे.

| | ऑक्टोबर ४८ सप्टेंबर ४९ | ऑक्टोबर ४९ सप्टेंबर ५० |
|---|---|---|
| डॉलर माल आयात | १२४·५४ | ११५·३१ |
| डॉलर माल निर्गत | ०१·९३ | १२४·८४ |
| तफावत | –३२·६१ | + ९·५३ |
| एकूण माल आयात | ६२४·०० | ५०४·६३ |
| एकूण माल निर्गत | ४०४·०० | ५१४·१३ |
| तफावत | –२२०·०० | + ९·५० |

× × ×

गेल्या सात महिन्यांत इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशननें कारखाने–गिरण्यांना रु. २,२८,९५,००० चीं कर्जें दिलीं. कांहीं तपशील–

रेऑन ५० लक्ष,
सीमेंट ५० लक्ष,
कापड गिरण्या ३५ लक्ष,
इलेक्ट्रिक यंत्र साधनें १९ लक्ष,
साखर २० लक्ष,
कापडगिरणी यंत्रें १५ लक्ष.

देशांतील अंतर्गत किंमती फार आहेत. कोरिया युद्ध सुरू झाल्यापासून परदेशांत जाणाऱ्या कांहीं मालाच्या परदेशांतील किंमती वाढल्या. त्याचा परिणाम अंतर्गत किंमती आणखी वाढूं नये म्हणून कांहीं पदार्थांवरील निर्गत कर तावडतोब वाढविण्यांत यावे असें बिल मांडण्यांत आलें. त्याप्रमाणें बाहेर जाणाऱ्या गोणपाटावर दर टनीं रु. ५० ऐवजीं रु. १५० आणि तागावर दर टनीं रु. ३५० ऐवजीं रु. १५०० कर आकारणी करावी असें आहे.

× × ×

मुंबईच्या परवांच्या कापड–गिरणी संपामुळें २० कोट, २० लक्ष वार कापड उत्पादन कमी झालें.

× × ×

२४ लक्ष एकर धान्यशेतीची जमीन आतां ताग लागवडीकरितां देण्यांत आली आहे. यामुळें ६९,६०० टन तांदूळ कमी झाला, तर तागाच्या ६ लक्ष गांठी वाढल्या.

तसेंच १३·७ लक्ष एकर धान्यशेतीची जमीन आतां कपास लागवडीकरितां देण्यांत आली आहे. यामुळें ३ लक्ष टन तांदूळ व व डाळी उत्पन्न कमी झालें आणि ३ लक्ष, ४० हजार कपास गाठींचें उत्पादन वाढलें.

× × ×

या वर्षी ६० लक्ष टन धान्य पीक वाढलें याचा परिणाम १९५१ मध्यें होईल; या वर्षी नाहीं.

× × ×

परदेशांतून अधिक धान्य आणावें लागल्यास त्याकरितां यांवयास लागणारा पैसा–हुंडणावळ पुरेशी आहे. अन्न–आयात वाढली तर त्याचा परिणाम इतर वस्तूंच्या आयातीवर होणार नाहीं, असा खुलासा अर्थमंत्र्यांनीं केला.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

**दि मिरज स्टेट बँक लि.**

–मिरज–

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

अधिकृत भांडवल ... रु. २५,००,०००
विकीस काढलेलें व खपलेलें ... रु. ११,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड ... रु. ९,७०,०००
एकूण खेळतें भांडवल ... रु. ७०,००,०००

शाखा


★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. के. डी. शिराळकर मॅनेजर




रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ता:—PEDNECO, Bombay. फोन नं. २१७३८

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.